वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) मुंबई

१)महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रू. २० कोटी वरून रू.२५ कोटी पर्यंत वाढविणे बाबत.

२)सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाकरीता महामंडळास भाग भांडवली अंशदान मंजुर करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग.
शासन निर्णय क्रमांकः-वनाम२०००/प्रक्र११७/विघयो-३
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०० ०३२.
दिनांकः- १० जुलै २००१.

वाचाः- १) शासन निर्णय क्रं.व्हीजेडब्ल्यु१०८३/८५/का-७ दिनांक १ ऑक्टोबर,१९८३.

२) व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) मुंबई यांचे क्रं.विजाभज/वित्त/२०७/२००० दि.१ जुलै २००० चे पत्र

**शासन निर्णयः-** वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) या शासन अंगिकृत उपक्रमाची निर्मिती शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक .व्हीजेडब्ल्यु१०८३/८५/का-७ दिनांक १ ऑक्टोबर,१९८३. अन्वये करण्यात येऊन हे महामंडळ कंपनी कायदा १९६० खाली पंजीबध्द झालेले आहे.

२. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवलात वेळोवेळी वाढ करून शासन निर्णय क्रमांक वनाम१०९४/२०२/प्रक्र४४/विघयो-२ दि :- १५ नोव्हेंबर, १९९६ अन्वये रू.२० कोटी पर्यंत वाढविण्यात आले होते. महामंडळाकडुन विमुक्त जाती व भटक्याजमातीतील व्यक्तींच्या उन्नतींकरिता विविध योजना राबविण्यात येतात. त्याकरिता निधी उपलब्ध व्हावा म्हणून सध्याच्या मंजूर भाग भांडवलात वाढ करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

३. आता शासन या निर्णयान्वये वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) चे अधिकृत भाग भांडवल रू.२० कोटी वरून रू.२५ कोटी पर्यंत ( रू.पंचवीस कोटी फक्त ) वाढविण्यास मंजुरी देत आहे.

४. महामंडळास मंजुर करण्यात आलेल्या अधिकृत भाग भांडवलातून सन २००१-२००२ या आर्थिक वर्षासाठी .वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळास रू.१.७५ कोटी ( रूपये एक कोटी पंचाहत्तर लाख फक्त )सन २००१-२००२ साठी भाग भांडवली अंशदान म्हणून मंजूर करण्यास शासन मान्यता देत आहे.

५. या बाबीसाठी भाग भांडवली अंशदानाची रक्कम अदा करण्यासाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी सदर भाग भांडवली अंशदान साध्या पावतीवरील देयकान्वये वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) मुंबई, यांना अदा करावे. तसेच सदर देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकारही त्यांना देण्यात येत आहेत.

६. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक शाकानि १००१/प्रक्र८/२००१/१८ (र व का) दि.:- २७ फेब्रुवारी २००१ अन्वये समाजकल्याण सांस्कृतिक कार्य प क्रीडा विभाग आणि विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग या विभागांचे विलीनीकरण करण्यात आले असून त्यांचे सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग असे नामकरण करण्यात आले आहे.

७. या बाबीवर होणारा खर्च " ४२२५, अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च -०३ मागासवर्गीयांचे कल्याण-१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूक (दोन) पंचवार्षिक योजनांर्तगत योजना (दोन) (एक) वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळ भाग-भांडवली अंशदान ( ४२२५ ०३८१) मागणी क्रमांक झेडबी ५ " या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकून सन २००१-२००२ साठी विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गासाठी कल्याण विभागासाठी करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीत तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ( ले व को) १९१३ दिनांक २०.०६.२००१अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्र..मु. भिशीकर)
शासनाचे उप सचिव

प्रति,
संचालक, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पुणे,
विभागीय समाजकल्याण अधिकारी मुंबई विभाग मुंबई
व्यवस्थापकीय संचालक,वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती,
विकास महामंडळ (मर्या.) मुंबई.
महा लेखापाल( लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र-१,मुंबई.
महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१,मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी,कोकण भवन,नवी मुंबई.
अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई.
कोषागार अधिकारी, ठाणे.
नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
अवर सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती/ विघयो-३.